मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# अनधिकृत होर्डिंगवर आता 'एआय'ची नजर

## शहरात 1 हजार 135 अधिकृत होर्डिंग : धोकादायक होर्डिंगवर तत्काळ कारवाई होणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

आकाश चिन्ह व परवाना विभागाकडे पुरेशा प्रमाणात मनुष्यबळ नसल्याने शहरातील अनधिकृत, परवानगीपेक्षा अधिक आकाराच्या जाहिरात होर्डिंगचे कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे (एआय) सर्वेक्षण केले जाणार आहे. सार्वजनिक भागीदारी (पीपीपी) तत्वावर ही प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. अनधिकृत, धोकादायक होर्डिंगवर तत्काळ कारवाई केली जाणार आहे.




पिंपरी-चिंचवड शहरात एक हजार १३५ अधिकृत होर्डिंग आहेत. तर, शंभर होर्डिंग धारकांचे परवाना नूतनीकरण झालेले नाही. अत्याधुनिक 'एआय' आधारित प्रणालीद्वारे शहरात असलेले आणि नव्याने उभारले जाणाऱ्या जाहिरात होर्डिंगवर देखरेख, नियंत्रण ठेवले जाणार आहे. आकाशचिन्ह व परवाना विभागाकडे मनुष्यबळ कमी असल्याने सर्वेक्षणाकडे दुर्लक्ष केले जात होते. 'एआय' या प्रणालीमुळे या कामासाठी लागणाऱ्या वेळेमध्ये आणि खर्चात बचत होणार आहे. शहरात अनधिकृत होर्डिंगवर कारवाई करणे सुलभ होणार आहे. आवश्यक ठिकाणी होर्डिंग उभारता येणार आहेत. या खासगी संस्थेला वाढलेल्या उत्पन्नातून १५ टक्के रक्कम महापालिका देणार आहे. संस्था हे काम दहा वर्षे करणार आहे.

'एआय' प्रणालीमध्ये अत्याधुनिक लेसर कॅमेरे बसवण्यात आले आहेत. विद्युत वाहनाद्वारे शहरातील सर्व होर्डिंगचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. त्यासाठी 'ड्रोन'चाही वापर केला जाणार आहे. सर्वेक्षणामध्ये शहरातील सर्व होर्डिंगचे ३६० अंश कोनातून छायाचित्र घेतले जाईल. ज्यामध्ये होर्डिंगची जमिनीपासून उंची, लांबी, रुंदी, धोकादायक स्थिती, होर्डिंग अधिकृत आहे की अनधिकृत अशी माहिती जमा केली जाईल. त्याचे विश्लेषण करून आकाशचिन्ह व परवाना विभाग कार्यवाही करणार आहे. 'एआय' प्रणालीद्वारे होर्डिंगची नेमकी व तंतोतंत माहिती मिळणार आहे. त्यामुळे उत्पन्नात भर पडणार आहे. अधिकृत किंवा अनधिकृत होर्डिंग कोणते, ते स्पष्ट होणार जाहे. त्यासाठी जागेवर जाऊन पाहणी करण्याची आवश्यकता असणार नाही. त्यामुळे वेळ व खर्चामध्ये बचत होणार आहे.

प्रत्येक होर्डिंगची ३६० अंश कोनातून माहिती जमा झाल्याने त्यात परस्पर बदल करता येणार नाही. अनधिकृत होर्डिंगचा शोध घेणे सुलभ होणार आहे. ही प्रक्रिया ऑनलाइन व कागदविरहित असल्याने प्रशासन आणि होर्डिंगधारकांच्या वेळेची, पैशांची बचत होणार असल्याचे अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी सांगितले.

### होर्डिंग परवाना ऑनलाइन

» होर्डिंग परवाना प्रक्रिया ऑनलाइन होणार असल्याने होर्डिंगधारकांना कार्यालयामध्ये यावे लागणार नाही. ती माहिती संग्रही राहणार असल्याने नूतनीकरणासाठी दरवर्षी कागदपत्रे उपलब्ध करून द्यावे लागणार नाहीत.

---

# चिखली-कुदळवाडीत सातव्या दिवशी 633 बांधकामांवर कारवाई

## सातव्या दिवशी 192 एकर जागेत असलेल्या 633 अनधिकृत पत्राशेड बांधकामांवर निष्कासन कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली-कुदळवाडी येथे सलग सातव्या दिवशी १९२ एकर जागेत असलेल्या ६३३ अनधिकृत पत्राशेड बांधकामांवर निष्कासन कारवाई करण्यात आली. याठिकाणी असलेले अनधिकृत पत्राशेड, कारखाने, गोदामे, भंगार दुकाने तसेच अनधिकृत बांधकामे या कारवाईमध्ये निष्कासित करण्यात आले.

नियोजित विकास आरक्षणे आणि नागरी सुविधा जागेवरील अनधिकृत बांधकामे हटविण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका आणि पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त मोहिमेतून चिखली-कुदळवाडी येथे निष्कासनाची कारवाई करण्यात येत आहे. याठिकाणी आज ८३ लाख ९७ हजार २४९ चौरस फूट बांधकाम निष्कासित करण्यात आले. यामध्ये एकूण ६३३ बांधकामाचा समावेश होता.

पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे आणि महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई हाती घेण्यात आली. या कारवाई वेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप



जांभळे पाटील, शहर अभियंता मकरंद निकम, उपआयुक्त मनोज लोणकर, राजेश आगळे, सीताराम बहुरे, क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे, शीतल वाकडे, अमित पंडित, सुचिता पानसरे, किशोर ननवरे, श्रीकांत कोळप, महेश वाघमोडे, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे यांच्यासह कार्यकारी अभियंता, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता सहभागी झाले होते. सह पोलीस आयुक्त शशिकांत महावरकर, अतिरिक्त पोलिस आयुक्त वसंत परदेशी यांच्या अधिपत्याखाली पोलीस उपआयुक्त स्वप्ना गोरे, डॉ. शिवाजी पवार, बापू बांगर, विवेक पाटील यांच्या नेतृत्वाखाली या परिसरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

या निष्कासनाच्या कारवाईमध्ये महापालिका अतिक्रमण धडक कारवाई पथकामधील ४ कार्यकारी अभियंते, १६ उपअभियंते, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे १८० जवान, ६०० पोलीस आणि मजूर कर्मचारी सहभागी झाले होते. तर ४४ पोकलेन, ८ जेसीबी, १ क्रेन आणि ४ कटर यांचा वापर करण्यात आला. ३ अग्निशमन वाहने आणि २ रुग्णवाहिका देखील याठिकाणी तैनात करण्यात आल्या होत्या. महापालिका आणि पोलीस यंत्रणेसह वीज वितरण कंपनीचे अधिकारी कर्मचारी देखील या कारवाईमध्ये सहभागी झाले होते.

# महापालिकेतून मिळतात बोगस जन्म-मृत्यू दाखले

## डेटा इंट्री करणाऱ्या दोघांना अटक : पोलिस ठाण्यात हजर राहण्याचे आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या जन्म-मृत्यू विभागात बनावट मृत्यू दाखला तयार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यातील दिघी सागरी पोलीसांनी महापालिकेच्या कोंढवा क्षेत्रीय कार्यालयातील डेटा इंट्री ऑपरेटर स्वप्निल रमेश निगडे व शुभम संजय पासलकर यांना अटक केली आहे. तसेच याप्रकरणी मृत्यूच्या खोट्या नोंदणी केल्याने महापालिकेचे संबंधित कर्मचारी व अधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करून त्यांना पोलिस ठाण्यात हजर राहण्याचे आदेश देण्यात यावे, असे पत्र महापालिकेस पाठविले आहे.



कॅम्प भागात राहणाऱ्या एका व्यक्तीची कोकणातील श्रीवर्धन येथे एक एकर जमीन होती. त्यांच्या नावाने बनावट कागदपत्रे तयार करून २०१९-२०२१ दरम्यान ही जमीन विकण्यात आली. ही बाब समोर आल्यावर मूळ मालकाने पोलिसांत तक्रार केली. त्यानंतर पोलिसांनी हा प्रकार गंभीर असल्याने त्याची तपासणी सुरू केली. त्यावेळी बनावट नावाने विक्री केलेल्या आरोपीचा पत्ता हा कात्रज येथील होता. त्यामुळे पोलिसांनी त्या भागात चौकशी केली असता, संबधित व्यक्ती २०२१ मध्येच मृत्यू पावल्याचे समोर आले.

यानंतर पोलिसांनी त्या व्यक्तीचे मृत्यू प्रमाणपत्र मागविले. त्यावेळी पालिकेकडून २०२१ मध्येच संबंधित व्यक्तीचा मृत्यू झाल्याचे कळविण्यात आले. पण, प्रत्यक्षात मृत्यूची नोंद झाल्याची तारीख एप्रिल २०२४ दाखविण्यात आली. त्यामुळे पोलिसांना संशय आला. त्यांनी पुन्हा महापालिकेस पत्र पाठवत मृत्यूची नोंद कोणी केली, त्यांचे प्रमाणपत्र, मोबाइल क्रमांक, नोंद करताना देण्यात आलेली कागदपत्रे, कार्यालयीन अर्जाची मागणी केली. मात्र, ही कोणतीच माहिती नसल्याचे महापालिकेने पोलिसांना कळविले. त्यामुळे पोलिसांनी पालिकेने दिलेल्या माहितीच्या आधारावर नोंद करणाऱ्या ठेकेदारांच्या कर्मचाऱ्यांना अटक केली आहे.

> पोलिसांकडून तक्रार करण्यात आलेल्या बनावट मृत्यू प्रमाणपत्राबाबत चौकशी सुरू केली आहे. त्यानुसार संबंधित कालावधीत अधिकाऱ्यांकडून खुलासा मागविण्यात आला आहे. ठेकेदारांच्या कर्मचाऱ्यांना काढून टाकण्यात आले आहे. तसेच हे प्रकार रोखण्यासाठी ठेकेदारांच्या कर्मचाऱ्यांसाठी कडक नियम केले जाणार आहेत. याची चौकशी सुरू असून, पुढील काही दिवसांत याचा सविस्तर अहवाल वरिष्ठांना सादर केला जाईल.
>
> **- डॉ. निना बोराडे, आरोग्य प्रमुख, पुणे महापालिका.**

# बंजारा समाज भवनासाठी 51 लाख रुपयांचा निधी

## आमदार सुनील शेळके यांची घोषणा : तळेगावमध्ये संत सेवालाल जयंती उत्साहात साजरी

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ तालुक्यात बंजारा समाज भवन बांधण्यासाठी आपण प्रयत्नशील असून, बंजारा बांधवानी मावळ तालुक्यात जागा उपलब्ध करून द्यावी. आपण समाज भवन बांधण्यासाठी ५१ लाख रुपयांचा निधी देऊ, असे आश्वासन मावळचे आमदार सुनील शेळके यांनी दिले.





बंजारा सेवा संघ, मावळच्या वतीने संत गुरु सेवालाल महाराजांच्या जयंतीनिमित्त तळेगाव दाभाडे येथील सुशीला मंगल कार्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तत्पूर्वी, जिजामाता चौक, मारुती मंदिर चौक ते सुशीला मंगल कार्यालया दरम्यान भव्य रथयात्रा काढण्यात आली. या रथयात्रेत मावळ तालुक्यातील बंजारा समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. त्यानंतर संत सेवालाल महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व भोग करण्यात आला. या मेळाव्याचे उदघाट्न उद्योजक संतोष पवार यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार सुनील शेळके होते.

यावेळी खासदार श्रीरंग बारणे, माजी राज्यमंत्री बाळा भेगडे, श्रीमंत सत्येंद्रराजे दाभाडे, याज्ञसेनीराजे दाभाडे, तळेगाव नगरपरिषदेच्या उपमुख्याधिकारी ममता चव्हाण - राठोड, तळेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक घोगरे, युवानेते रवींद्र भेगडे, बंजारा सेवा संघ मावळचे संस्थापक अध्यक्ष हिरा रतनू जाधव, अध्यक्ष महादेव राठोड, उपाध्यक्ष चंदू राठोड, देसू राठोड, सचिव अमरजीत चव्हाण, खजिनदार राजू पवार, अभिनेते आशुतोष राठोड, मार्ग फाऊंडेशन सोलापूरचे अध्यक्ष संतोष पवार, शंकर पवार, जयराम चव्हाण, विजापूरचे माजी स्थायी समिती अध्यक्ष रामभाऊ राठोड, देवेंद्र राठोड, विठ्ठल राठोड, शेट्टीप्रताप चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

आमदार शेळके म्हणाले, की बंजारा समाज हा मेहनत करून जीवन जगणारा समाज आहे. आज शिक्षण घेऊन हा समाज मुख्य प्रवाहात आला आहे. अनेकजण उच्चशिक्षित असून, मोठ्या अधिकारीपदावर कार्यरत आहेत. या समाजाला हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत.

ममता राठोड यांनी बंजारा समाजाचे योगदान लक्षात घेऊन या समाजाला हक्काचे व्यासपीठ समाजभवन मिळावे,अशी मागणी समाजाच्या वतीने केली. खासदार श्रीरंग बारणे, सत्येंद्रराजे दाभाडे, रवींद्र भेगडे, संतोष पवार यांनीही विचार व्यक्त केले. प्रास्ताविक हिरा जाधव यांनी केले. सूत्रसंचालन नितीन पांडे यांनी केले, तर लखन जाधव यांनी आभार मानले.



# रस्ते व जलनिस्सारणाच्या कामांना गती


## स्थायी समितीत आयुक्त शेखर सिंह यांची मान्यता, पक्के रस्ते, सांडपाणी व्यवस्थापनाची कामे लागली मार्गी

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या हद्दीत विविध ठिकाणी जलनिस्सारण नलिका टाकणे, जलनिस्सारण विषयक सुधारणा विषयक कामे करणे, पावसाळी पाण्याची लाईन टाकणे, रस्त्याची दुरुस्ती व हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करण्याच्या विषयासह विविध विषयास प्रशासक तथा आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली

महापालिकेच्या हद्दीत विविध ठिकाणी जलनिस्सारण नलिका टाकणे, जलनिस्सारण विषयक सुधारणा विषयक कामे करणे, पावसाळी पाण्याची लाईन टाकणे, रस्त्याची दुरुस्ती व हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करण्याच्या विषयासह विविध विषयास प्रशासक तथा आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली.

पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनातील स्थायी समिती सभा आणि महापालिका सभा पार पडली. विविध विषयांना प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली.



### गणेशनगर, रुपीनगर, सहयोगनगर परिसरातील नव्याने स्टॉर्म वॉटर लाईनला मान्यता

» प्रभाग क्र. २ मधील चिखली, कुदळवाडी परिसरातील रस्त्याचे हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करणे, प्रभाग क्र. १२ मधील गणेशनगर, रुपीनगर, सहयोगनगर परिसरातील स्टॉर्म वॉटर लाईनची दुरुस्ती करणे, आवश्यक्यतेनुसार नव्याने स्टॉर्म वॉटर लाईन टाकणे, प्रभाग क्र. ११ मधील शरदनगर मधील नव्याने ताब्यात येणाऱ्या रस्त्यांचे खडीमुरुमीकरण व डांबरीकरण करणे, आणि पूर्णानगर शिवतेजनगर, फुलेनगर, कृष्णानगर भागातील रस्ते हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करणे, प्रभाग क्र ९ मधील उद्यमनगर, खराळवाडी व इतर परिसरातील रस्त्यांचे हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करणे, प्रभाग क्र. ६ मधील महादेवनगर, लांडगे वस्ती, सद्गुरू नगर व परिसरातील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या विषयास मान्यता दिली.

शहरातील वापरात नसलेले किंवा दुरावस्थेत मोडकिस अवस्थेत असलेले सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांचा सर्व्हे करून निष्कासित करण्याच्या विषयासह ब क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत नवीन तालेरा हॉस्पिटलमध्ये ऑपरेशन थिएटर करिता विद्युत विषयक तसेच मेडिकल गॅस पाईपलाईन व इतर अनुषंगिक काम करण्याच्या विषयास यांनी मान्यता दिली.

चऱ्होली व कासारवाडी मैलाशुध्दीकरण केंद्राची कामे

या सभेत चऱ्होली व कासारवाडी मैलाशुध्दीकरण केंद्रांतर्गत प्रभाग क्र. २ चिखली, मोशी, प्रभाग क्र. ९ नेहरुनगर, अजमेरा सोसायटी व उर्वरित परिसरात जलनिस्सारण नलिका आणि मॅनहोल चेंबरचे वार्षिक पद्धतीने देखभाल दुरुस्ती करणे, कासारवाडी मैलाशुध्दीकरण केंद्रांतर्गत इंद्रायणीनगर सेक्टर क्र. १ ते १३ मधील लांडगेनगर, गवळीमाथा, खंडेवसी, बालाजीनगर व उर्वरित परिसरात जलनि:सारण विषयक सुधारणा कामे करण्यास स्थायी समितीत आयुक्त शेखर सिंह यांची मान्यता, पक्के रस्ते, सांडपाणी व्यवस्थापनाची कामे लागली मार्गी

### हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करण्याच्या मान्यता

» महापालिकेच्या प्रभाग क्र. २५ येथील पुणे बेंगलोर हायवेच्या पूर्वेकडील वाकड, ताथवडे परिसर व इतर भागात पावसाळी पाण्याची लाईन टाकणे व स्थापत्य विषयक कामे करणे, प्रभाग क्र. ४ बोपखेल येथील विविध ठिकाणी रस्ते डांबरीकरण करून सुधारणा करणे व विकसित करणे, प्रभाग क्र. ८ सेक्टर नं. ४,६,९ येथील एमआयडीसी व इतर ठिकाणी रस्त्यांची दुरुस्ती करणे व हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करण्याच्या विषयास आज झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

### जलशुद्धीकरण केंद्र ते इंद्रायणी नदीपर्यंत नाला बांधण्याच्या मान्यता

» प्रभाग क्र. १ मोरेवस्ती, चिंचेचा मळा परिसरात आवश्यक ठिकाणी नवीन ठिकाणी स्टॉर्म वॉटर लाईन टाकणे, शेलारवस्ती परिसरातील रस्ते व महापालिकेच्या ताब्यात असलेले औद्योगिक परिसरातील रस्ते हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करणे आणि नवीन जलशुद्धीकरण केंद्र ते इंद्रायणी नदीपर्यंत नाला बांधण्याच्या विषयास मान्यता दिली.

# नदीपात्रालगत आणि पूररेषेतील अनधिकृत बांधकाम रडारवर

## आयुक्त शेखर सिंह यांची माहिती, पवना, इंद्रायणीसह मुळा नदीपात्रात 3 हजारांहून अधिक बांधकामे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातून वाहणाऱ्या पवना, इंद्रायणी आणि मुळा नदीपात्रालगत आणि पूररेषेतील अनधिकृत बांधकामांवरदेखील कारवाई करण्यात येणार आहे. यामध्ये नव्याने झालेली बांधकामे, व्यावसायिक बांधकामे आणि पत्राशेडवर कारवाईचे नियोजन केले आहे, अशी माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली. याबाबत पूररेषेच्या अगोदर बांधलेल्या निवासी बांधकामांवर कारवाई करणार नसल्याचेही म्हटले आहे.

महानगरपालिकेत झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर, उपायुक्त अण्णा बोदडे, साहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात आदी उपस्थित होते.



आयुक्त शेखर सिंह म्हणाले की, चिखलीतील भंगार दुकाने, गोदामामुळे हवा आणि नद्यांचे प्रदूषण वाढले होते. त्या व्यावसायिकांकडे अग्निशामक, पर्यावरण, प्रदूषण नियंत्रण मंडळ, अनधिकृत बांधकामे यांची कोणाची देखील परवानगी आणि ना हरकत दाखले नव्हते.

त्यामुळे चिखली, कुदळवाडी भागात सरसकट कारवाई करण्यात आली आहे. तसेच शहरातील काळेवाडी, पिंपरी, वाल्हेकरवाडी, तळवडे, सांगवी आदी भागांतील भंगार व्यावसायिकांवर देखील शंभर टक्के कारवाई करण्यात येईल, असे म्हटले आहे.

तसेच, वायू व जलप्रदूषण होत आहे. महापालिका व एमआयडीसी माणुसकीच्या नात्यातून तेथे पाणीपुरवठा केला आहे. अनधिकृत भंगार व्यावसायिकांवर महापालिका काहीच कारवाई करीत नाही, असे वृत्तपत्रातून आमच्यावर सातत्याने टीका होत होती. त्यामुळे आम्ही कुदळवाडीत कारवाई केली.

त्या कारवाईनंतर शहरातील सर्व भंगार व्यावसायिकांवर कारवाई करण्यात येणार आहे. तळवडे, काळेवाडी, पिंपरी, वाल्हेकरवाडी, सांगवी यासह सर्व ठिकाणच्या भंगार दुकाने व गोदामांवर कारवाई केली जाईल. शहरात एकही भंगार व्यावसायिक ठेवला जाणार नाही. त्यांनी शहराच्या बाहेर जाऊन व्यवसाय करावा, असा थेट इशारा आयुक्त सिंह यांनी दिला आहे.

### 14 कामगारांचा मृत्यू आणि अग्निशमन परवाना

» तसेच तळवडेतील कारखान्यात १४ महिला कामगारांचा मृत्यू झाला. कृष्णानगर येथील एका हार्डवेअरच्या दुकानात एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू झाला. त्या आगीच्या घटनेनंतर महापालिकेने शहरातील सर्व व्यावसायिक आस्थापनांचे सर्वेक्षण केले. त्यात कुदळवाडीतील भंगार व्यावसायिकांकडे प्रदूषण नियंत्रण मंडळ, कामगार आयुक्त, महानगरपालिका तसेच, अग्निशमन विभागाचे कोणतेही परवाने नसल्याचे आढळून आले. या ठिकाणी वारंवार आगीच्या घटना घडतात.

# सुर्वे समितीच्या अहवालासाठी मुख्यमंत्र्यांसोबत बैठक

## जलसपंदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील : आमदार कुल यांच्याकडून जिल्ह्यातील प्रश्न मार्गी

**पुणे | प्रतिनिधी**

जलविद्युत निर्मितीसाठी मुळशी व कोयना प्रकल्पाद्वारे कृष्णा खोऱ्यातील नैसर्गिकरित्या पूर्वमुखी नद्यांचे कृत्रिमपणे पश्चिमेकडील विपुलतेच्या खोऱ्यात वळविलेले पाणी पूर्वेकडे तुटीच्या खोऱ्यात वळविण्याबाबत सुर्वे समितीचा अहवाल सादर करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत बैठक घेण्यात येईल, त्यासाठी आवश्यक अहवाल संबधित विभागाने तयार करावेत असे आदेश जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

दौंड तालुक्याशी निगडीत जलसंपदा विभागाच्या विषयांबाबत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार राहुल कुल यांच्या उपस्थितीत मुंबई येथे बैठक आयोजित केली होती. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीत तालुक्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या जलसिंचन योजनांच्याबाबत मंत्री विखे यांनी तात्काळ कारवाईचे आदेश दिल्याची माहिती दौंडचे आमदार राहुल कुल यांनी दिली. यावेळी जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या कालव्यांना बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमध्ये रुपांतरण करणे व अस्तरीकरण करणे या कामासाठी सुमारे ४३८.४८



### नवीन बॅरेजेससाठी समितीची स्थापना

» दौंड तालुक्यातील उजनी धरणाच्या बँक वॉटर क्षेत्रात नवीन बॅरेजेस बांधणेसाठी सुधारित धोरण ठरविण्याची मागणी केली आमदार राहुल कुल यांनी केली असून त्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली असून, यामुळे दौंड, शिरूर, श्रीगोंदा, कर्जत, करमाळा परिसरातील शेतकऱ्यांना देखील याचा फायदा होणार असल्याने त्यावर तातडीने कार्यवाही करावी, असे आदेश मंत्री विखे पाटील यांनी दिले.

### वंचित भागाला पाणी द्यावे

» पुरंदर उपसा सिंचन योजनेच्या मौजे कुपटेवाडी, (ता. दौंड, जि. पुणे) येथील वितरिकेच्या वरील बाजूस वंचित भागाच्या सिंचनासाठी नवीन पाइपलाइन करणेसाठी सर्वेक्षण करण्यासाठी सुमारे १७.४३ लक्ष निधी उपलब्ध झाला असून, पुढील महिनाभरात सर्वेक्षण पूर्ण करावे तसेच नव्याने समविष्ट करायचे तलाव समाविष्ट करून जास्तीत जास्त वंचित भागाला पाणी देण्यात यावे अशा सूचना केल्या .चिबड, खारवट व पाणथळ शेतजमिनी निर्मुलन करण्यासाठी दौंड तालुक्यातील सर्वेक्षण पूर्ण करून प्रस्ताव सादर करून त्यास मान्यता मिळण्यासाठी मापदंड मंजुरीसाठी आवश्यक कार्यवाही शासन स्तरावर सुरु असून, वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. वित्त विभागाच्या मान्यतेनंतर याबाबत प्रस्तावांना मान्यता देण्यात येणार आहे.

कोटी रुपयांच्या कामाला राज्य मंत्रिमंडळाकडून प्रशासकीय मान्यता मिळाल्याबद्दल मंत्री विखे यांचे तालुक्याच्या वतीने सत्कार करीत आमदार कुल यांनी आभार मानले.

विखे म्हणाले की, खडकवासला ते फुरसुंगी बंदनळी कालवा कामासाठी राज्य शासनाकडून २२०० कोटी रुपये निधी मंजूर केला असून त्याचे कार्यारंभ आदेश दिला आहे. त्यासाठी आवश्यक पर्यावरण व वन विषयक मान्यतेचे प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले आहे. तातडीने काम सुरु करण्याचे आदेशही दिले. जुना मुठा उजवा कालवा (बेबी कॅनॉल) अस्तरीकरण व दुरुस्तीसाठी १८० कोटी रुपये राज्य शासनाकडून मंजूर केले असून त्याची सुरु असलेली कामे गतिमान करावीत व शेतकऱ्यांच्या आवर्तनावर परिणाम होणार नाही याची देखील काळजी घावी, अशा सूचनाही केल्या आहेत. यावेळी अपर मुख्य सचिव दीपक कपूर, कार्यकारी संचालक अतुल कोपोले, प्रकल्प समन्वयक संजय बेलसरे, मुख्य अभियंता हनुमंत गुनाले, हनुमंत धुमाळ, जलसंपदा विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

पुरंदर उपसा सिंचन योजनेच्या मौजे कुपटेवाडी, (ता. दौंड) येथील वितरिकेच्या वरील बाजूस वंचित भागाच्या सिंचनासाठी नवीन पाईपलाईन करणेसाठी सर्वेक्षण करण्यासाठी सुमारे १७.४३ लाख निधी उपलब्ध झाला असून, पुढील महिनाभरात सर्वेक्षण पूर्ण करावे तसेच नव्याने समविष्ट करायचे तलाव समाविष्ट करून जास्तीत जास्त वंचित भागाला पाणी द्यावे अशा सूचना केल्या.

चिबड, खारवट व पाणथळ शेतजमिनी निर्मूलनासाठी धोरण ठरविणे कार्यवाही सुरु असून, वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर केला आहे. वित्त विभागाच्या मान्यतेनंतर याबाबत प्रस्तावांना मान्यता देणार असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

# रामलिंग यात्रेला महाशिवरात्रीपासून प्रारंभ; नियोजनासाठी शिरूर तहसिल कार्यालयात पार पडली बैठक

## शिरूर शहरासह पंचक्रोशीचे आराध्य दैवत प्रभू श्री रामलिंग महाराजांच्या महाशिवरात्रीला होत असलेल्या यात्रा महोत्सवास यंदा 51 वर्षे पूर्ण होत असल्याने यात्रेची जय्यत तयारी सुरु करण्यात आली आहे

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्हयातील शिरूर तालुक्यातील शिरुर शहरासह पंचक्रोशीचे आराध्य दैवत प्रभू श्री रामलिंग महाराजांच्या महाशिवरात्रीला होत असलेल्या यात्रा महोत्सवास यंदा 51 वर्षे पूर्ण होत असल्याने यात्रेची जय्यत तयारी सुरू करण्यात आली आहे. तीन दिवस चालणाऱ्या यात्रा उत्साहाच्या नियोजनाची बैठक शिरूर तहसिलदार बाळासाहेब म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

शिरूर शहरापासून तीन किलोमीटर अंतरावर श्री रामलिंग मंदिर असून, या मंदिरातील शिवलिंगाची स्थापना खुद प्रभू श्री रामचंद्रांनी



### सुविधेसाठी प्रशासन सज्ज

» वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज झाली असून भव्य अशा पार्किंगची सोय केलेली आहे. तसेच आरोग्य विभाग रुग्णवाहीकेसह सज्ज राहणार आहे. यावेळी शिरूर तहसीलदार बाळासाहेब म्हस्के, पोलीस निरीक्षक संदेश केंजळे, सरपंच अरुणराव घावटे, माजी सरपंच तुषार दसगुडे, उपसरपंच बाबाजी वर्पे, माजी सरपंच नामदेव जाधव, खजिनदार पोपटराव दसगुडे, ट्रस्टी बलदेवसिंग परदेशी ,रावसाहेब घावटे, नामदेवराव घावटे, शिरूर नगरपरिषदेचे राहुल पिसाळ, पशुवर्धन विभागाचे श्रीमंदिलकर सर, विस्तार आधिकारी आर .आर. राठोड ,आरोग्य विभागाचे राजेश कट्टीमनी, वाहतुक शाखेचे राजेंद्र वाघमोडे उपस्थित होते.

केल्याची आख्यायिका आहे. दरवर्षी महाशिवरात्रीला या देवस्थानची मोठी यात्रा भरते. दि. २५ फेब्रुवारीला शिरूर येथून रामलिंग येथे पालखीचे प्रस्थान होत आहे . दि. २६फेब्रुवारी रोजी रामलिंग येथे महाशिवरात्रीनिमित्त भव्य यात्रेचे आयोजन केले जाते. लाखो भाविक भक्त या ठिकाणी दर्शन घेण्यासाठी येत असतात. दि. २७ फेब्रुवारी या दिवशी भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजित केली जाणार आहे. शिरूर तालुक्यातील शिरुर शहरासह पंचक्रोशीचे आराध्य दैवत प्रभू श्री रामलिंग महाराजांच्या महाशिवरात्रीला होत असलेल्या यात्रा महोत्सवास यंदा 51 वर्षे पूर्ण होत असल्याने यात्रेची जय्यत तयारी सुरू करण्यात आली आहे.

यावेळी तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांनी आरोग्य विभाग, पंचायत समिती पोलीस विभाग, पशुसंवर्धन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामीण रुग्णालय शिरूर, महावितरण, रामलिंग देवस्थान, ग्रामपंचायत विभाग यांच्याकडून यात्रेसाठी भाविकांना देण्यात येणाऱ्या सुखसुविधांची माहिती घेवून यात्रा सुरळीत व्यवस्थित पार पाडण्यासाठी सूचना केल्या आहेत.